## नियमित दिवाणी दावा क्रमांक ३७/२०१८ मधील निशाणी क्रमांक १२८ खालील आदेश

## (CNRNO-MHRT080002852018)

दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पाहिले.

०२. प्रस्तुतचा दावा हा निरंतर ताकिदीकरीता दाखल करण्यात आला आहे. निशाणी क्रमांक ११९, १२२ व १२३ वर युक्तीवादासाठी प्रकरण नेमण्यात आले असताना दि. ११/०६/२०२५ रोजी वादीस शेवटची संधी देण्यात आली होती, असे अभिलेखावरुन दिसून येते. त्यानंतर दि. १६/०७/२०२५ व १०/०९/२०२५ रोजी सदरचा युक्तीवाद झालेला नसल्याचे दिसून येते. त्यानंतर दि. १५/१०/२०२५ रोजी वादीतर्फे युक्तीवादासाठी मुदत मिळणेसाठी दिलेला विनंती अर्ज नामंजूर करण्यात आल्याचे दिसून येते. निशाणी क्रमांक ११९ कडील अर्ज हा साक्षीसमन्स काढण्यासाठी असून निशाणी क्रमांक १२२ कडील अर्ज हा कागद हजर करण्यासाठी व निशाणी क्रमांक १२३ कडील अर्ज हा प्रतिवादी क्र. ०१ ला वादीतर्फे नोटीस देण्यासाठी असल्याचे दिसून येते. सदरचे तिनही अर्ज गुणदोषावर निकाली काढण्याच्या दृष्टीने वादीतर्फे सदर तिन्ही अर्जांवर युक्तीवाद ऐकणे, न्यायाच्या दृष्टीकोनातून गरजेचे वाटते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे–

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मा. जिल्हा विधी सेवा, समिती रत्नागिरी रक्कम रुपये २००/– (रुपये दोनशे मात्र) इतकी खर्चाची रक्कम भरण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. आदेशान्वये वादीने पुढील तारखेस किंवा तत्पुर्वी पुर्तता करावी व सदर तिन्ही अर्जांवर युक्तीवाद करावा.

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.06.10 15:47:44 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दिनांकः १०/०६/२०२६** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवरुख,**

**देवरुख.** **जि. रत्नागिरी.**

-: **C E R T I F I C A T E** :-

I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Evidence/Order/Judgment .

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | A. A. Shivalkar |
| Court Name | : | The Court of Civil Judge Junior Division and Judicial Magistrate F.C., Deorukh. |
| Date of Decision | : | 10/06/2026 |
| Order signed by Presiding Officer on | : | 10/06/2026 |
| Order uploaded on | : | 10/06/2026 |